# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र./मनपा/उदयान/१७३३/२०२५-२६ दिनांक: १८ / ०२/२०२६

मिरा - भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर (प.)

प्रति,
सिस्टम मॅनेजर,
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय — संकेत स्थळावर जाहिर नोटीस सुचना प्रसिध्द करणेबाबत.
(विकास कामात बाधित झाडे मुळासहित काढणे बाबत)**

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाची मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकास कामात बाधित झाडे मुळासहित काढणेकामी सोबत जोडलेली जाहिरात नोटीस सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

सोबत :- जाहिर नोटीस प्रत.

(नागेश विरकर)
वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दिनांक: १८/०२/२०२६

जा.क्र./मनपा/उद्यान/१८३३/२०२५-२६

**// जाहीर नोटीस सुचना //**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या कलम ८(३) अन्वये या नोटीसव्दारे असे जाहीर करण्यात येत की मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकासकामात बाधित झाडे मुळासहित काढणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | झाडाचे नाव | अंदाजे उंची | नग | झाडांचे वय | पुर्न:रोपण/ मुळासहित काढणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गुलमोहर | १५ ते २० फुट | ०१ | १३ वर्ष | मुळासहित काढणे | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (पू.), आर.एन.पी पार्क, कोळीवाडा मच्छिमार्केट जवळ येथे जलवाहिनीवर गुलमोहराचे झाड उंच वाढलेले असून सदर ठिकाणी वितरण जलवाहिनी नादुरुस्त होऊन त्याठिकाणी पाण्याची गळती होत आहे. त्यामुळे आर.एन.पी पार्क व जेसल पार्क परिसराला कमी दाबाने पाणी पुरवठा होत असुन गळतीमुळे दुषित पाणी पुरवठा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याकरीता जलवाहिनीवरिल गळती दुरुस्तीचे काम तातडीने करणे आवश्यक आहे. सदरचे झाड दुरुस्तीच्या कामात बाधित होत आहे. या कारणास्तव ०१ नग झाड मुळासकट काढणे आवश्यक आहे. **(मा. कार्यकारी अभियंता यांचे दि.१०/०२/२०२६ रोजीचा अर्ज)** |
| २ | पिंपळ | १८ ते २० फुट | ०१ | १३ वर्ष | | मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयातील ड्रायव्हर रूमच्या पाठीमागील बाजूस असलेल्या भिंतीमध्ये 01 नग पिंपळाच्या झाडाची अनियंत्रित वाढ झालेली आहे. सदर झाड भिंतीमध्ये उगवल्यामुळे भिंतीस तडे गेले असून, भिंत पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या करणास्तव झाड काढणे आवश्यक आहे. **वैद्यकीय अधिकारी, भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय यांचे दि.२५/११/२०२५ रोजीचे पत्र.** |
| ३ | कदम | १५ ते २० फुट | ०१ | १८ वर्ष | | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरा रोड (पु.) नयानगर, अल-शम्स मस्जिद जवळ अस्मिता समिर को.ऑ.हो.सो.लि या सोसायटीच्या आवारात ०१ नग झाड आहे. सदरचे झाड धोकादायकरित्या वाढले असून एका बाजुस झुकलेले आहे. तसेच झाडाची मुळे जमिनीवर आल्यामुळे आजू बाजुचे बांधकाम देखील तुटले आहे. जोऱ्याच्या वाऱ्याने झाड पडून जिवित व वित्तहाणी होण्याची शक्यता नाकराता येत नाही. या करणास्तव झाड काढणे आवश्यक आहे. **अस्मिता समिर को.ऑ.हौ.सो.लि यांचे दि.२०/०१/२०२६ रोजीच पत्र.** |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरीकांच्या काही हरकती असल्यास जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत लेखी स्वरूपात उप-आयुक्त (उदयान), उद्यान विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे किंवा garden@mbmc.gov.in या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदती नंतर प्राप्त होणाऱ्या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

(नागेश विरकर)
वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका